# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

**(ISO 9001:2008 प्रमाणित)**

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

http://www.dteau.org Email- roaurangabad@dtemaharashtra.gov.in

डिजीटाईज्ड कालबध्द सेवा वर्ष - २०१५


जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१८/ 3053

दिनांक :- 16 OCT 2018

प्रति,

**प्राचार्य,**

सर्व शासकीय /अनुदानीत/विना अनुदानीत अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र/
व्यवस्थापन शास्त्र/वास्तुशास्त्र पदविका, पदवी व पद्व्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था

विषय : **महाडीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांचे अर्ज तात्काळ नोंदणी करुन घेऊन सदरील अजास ऑनलाईन पध्दतीने तात्काळ मान्यतेस्तव पाठविण्याबाबत. . . . .**

महाराष्ट्र शासनाने विविध शिष्यवृत्ती योजना एका छत्राखाली आणल्या आहेत. त्यासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करुन, विद्यार्थ्यांच्या खाती शिष्यवृत्ती जमा होण्यापर्यंतची सर्व प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने **mahadbtmahait.gov.in** हया पोर्टलवर करण्यात येत आहे हे आपणास ज्ञात आहेच. त्यासाठी पाहिल्या टप्यात संस्थेची पोर्टलवर नोंदणी, अभ्यासक्रमास व शुल्कास मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. अद्यापपर्यंत कांही संस्थांनी ही कार्यवाही पूर्ण केली नसल्यास, त्या संस्थांनी दि. १७/१०/२०१८ पर्यंत पूर्ण करावी.

संस्थेची नोंदणी व शुल्क मान्यतेनंतर सर्व संस्थांनी विद्यार्थ्यांकडुन **mahadbtmahait.gov.in** पोर्टलवर अर्ज तात्काळ भरुन घ्यावेत. संस्थांनी दररोज २ ते ३ तास विद्यार्थ्यांना संस्थेतील संगणकीय प्रणाली अर्ज नोंदणीसाठी वापरण्यास उपलब्ध करुन द्यावी व तेथे तज्ञ व्यक्ती नेमून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करुन पुढील आठवडयापर्यंत म्हणजेच दि. २६/१०/२०१८ पर्यंत अर्ज विद्यार्थ्यांकडुन भरुन घ्यावेत व विद्यार्थ्यांकडुन प्राप्त अर्ज दररोज क्लर्क व प्राचार्य लॉगीन मधून मान्यता देऊन पुढील मान्यतेस्तव पाठविण्यात यावेत. विद्यार्थ्यांकडुन प्राप्त अर्जावर शिष्यवृत्तीची रक्कम व शुल्काची रक्कम दिसत नसेल तर ते अर्ज विद्यार्थ्यांना परत पाठविण्यात यावेत. रक्कम दिसत असल्यास ते मान्यतेस्तव ऑनलाईन पध्दतीने या कार्यालयास पाठविण्यात यावेत. विद्यार्थाचे अर्ज विना कार्यवाहीचे संस्थेच्या लॉगीनमध्ये राहू नयेत याची काळजी घ्यावी.

डीबीटी पोर्टलवर नोंदणी करुन शुल्कास मान्यता घेणे व सर्व पात्र विद्यार्थ्यांना सुचना देऊन त्यांच्या कडून ऑनलाईन अर्ज व्यवस्थितरित्या घेऊन ते संस्था स्तरावर मान्यता देऊन पूढील मान्यतेस्तव पाठविणे (वेळेत सर्व प्रक्रिया पूर्ण करणे) ही सर्वस्वी संस्थेची जबाबदारी आहे.

सदरील कामे वेळेत पूर्ण होतील याची दक्षता घ्यावी. विद्यार्थ्यांना वेळेत शिष्यवृत्ती न मिळाल्यास त्यास सर्वस्वी संस्था जबाबदार राहील. त्यासाठी संस्था प्रमुख कारवाईस पात्र राहतील, याची नोंद घ्यावी.

**(महेश शिवणकर)**
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत : १) मा. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीकरीता सविनय सादर.
२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीकरीता सविनय सादर.
३) या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यास्तव.